# महाराष्ट्र वित्त व लेखा प्रशिक्षण केंद्र चेंबूर, मुंबई

59 नवीन प्रशासकीय इमारत क्रमांक-2, दुसरा मजला,आर.सी.चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-71
दूरध्वनी क्रमांक 25246028 Email-ad.training@mahakosh.in

ससंलेवको/कोवि/प्रशिक्षण/ 127 दिनांक - 13/07/2016

प्रति,

----------------------------------
----------------------------------
----------------------------------
----------------------------------

विषय : महाराष्ट्र लेखा सेवा नियम प्रशिक्षण सत्र क्रमांक 205 व
महाराष्ट्र पर्यवेक्षी प्रशिक्षण सत्र क्र. 121 ( दि. 08/08/2016 ते दि. 29/10/2016)

महोदय,

महाराष्ट्र वित्त व लेखा प्रशिक्षण केंद्र चेंबूर यांचेमार्फत लेखालिपिक व पर्यवेक्षी प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जातात. आपल्या कार्यालयाच्या गरजा विचारात घेऊन मा. संचालक महोदयांच्या मान्यतेने सदरहु 50 दिवसाच्या सत्राचे विषयानुसार 5 सत्रांमध्ये व 60 दिवसाच्या सत्राचे 7 सत्रांमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे आपल्या कार्यालयातील कर्मचारी त्यास आवश्यक असणाऱ्या सत्रासाठीच हजर राहू शकतो किंवा त्यास सर्व सत्रांना हजर राहावयाचे असले तरी सुध्दा तो तशी निवड करु शकतो.

यास्तव आपणास विनंती करण्यात येत आहे की, आपल्या सोईनुसार व कर्मचाऱ्यांची गरज लक्षात घेऊन सोबतच्या यादीतील सत्रानुसार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्याची व्यवस्था करावी.

लेखा व सेवा नियम प्रशिक्षण सत्र क्र. 205 हे दि. 08/08/2016 ते दि. 17/10/2016 या कालावधीत पाच सत्रात आयोजित करण्यात आलेले आहे. व पर्यवेक्षी प्रशिक्षण सत्र क्र. 121 हे दि. 08/08/2016 ते 29/10/2016 या कालावधीत सात सत्रात आयोजित करण्यात आले आहे. (सोबत सविस्तर वेळापत्रक जोडले आहे.)

आपल्या नियंत्रणाखालील कार्यालयातील तसेच आपल्या कार्यालयातील कर्मचा-यांना प्रशिक्षित करण्यासाठी आपण त्यांची नांवे कार्यालयीन प्रमुखांच्या शिफारशीसह दिनांक 04/08/2016 पूर्वी या कार्यालयास कळविण्याची कृपया व्यवस्था करावी.

प्रशिक्षणासाठी नावाची शिफारस करतेवेळी खालील बाबींचा कृपया विचार करावा.

1. सदर प्रशिक्षणासाठी संपूर्ण अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणे बंधनकारक नसून आपल्या कार्यालयाला आणि संबंधित कर्मचा-यांना आवश्यक अशा विशिष्ट मोडयुल्सना प्रवेश घेता येईल.
2. सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार संबंधित कार्यालयाने आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नावे किमान 4 दिवस अगोदर कळविणे आवश्यक आहे.

(कृ.मा.प.)

3. पूर्वी ज्या कर्मचाऱ्यांची नांवे प्रशिक्षणासाठी पाठविली होती परंतु त्यांची निवड झालेली नसेल अशा कर्मचाऱ्यांची पुन्हा शिफारस करणे जरुरीचे आहे, कारण अशा कर्मचाऱ्यांची प्रतिक्षा यादी या कार्यालयात ठेवण्यात येत नाही.
4. संपूर्ण सत्रासाठी किंवा ज्या मोडयुल्स साठी ज्या कर्मचाऱ्यांची शिफारस केलेली आहे त्यांना या कार्यालयाकडून पुन्हा स्वतंत्र निवडपत्र पाठविले जाणार नाही. तेव्हा अशा कर्मचा-यास तो ज्या मोडयुल्ससाठी येणार आहे त्या दिवशी कार्यालयीन वेळेवर या प्रशिक्षण केंद्रात हजर होईल या दृष्टीने त्याला कार्यमुक्त करावे व तसे या कार्यालयाला कळविण्याची व्यवस्था करावी. कार्यालयास निवडपत्र आवश्यक असल्यास ई- मेल द्वारे पाठविण्यात येईल.
5. प्रशिक्षण घेत असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुंबई वास्तव्यात स्वखर्चाने रहाण्याची व्यवस्था करावी लागेल. त्यांना मुंबईतील वास्तव्यासाठी शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या दैनिक भत्त्याच्या दरानुसार मुक्काम भत्ता व प्रवास भत्ता अनुज्ञेय आहे. तसेच ज्या प्रशिक्षणार्थ्यांचे मुख्यालय बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत आहे त्यांना हातखर्ची भत्ता अनुज्ञेय असेल.
6. उमेदवारांना प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करतांना त्यांच्या नैमित्तीक रजेची माहिति त्यांच्या सोबत पाठवावी.
7. या प्रशिक्षणासाठी कोणत्याही इच्छुक अधिकारी /कर्मचा-यास प्रवेश देण्याची सुविधा उपलब्ध करण्यांत आली आहे. तथापि आसने मर्यादित असल्यामुळे प्रवेश आसनक्षमतेच्या मर्यादेत ' प्रथम येणाऱ्यास प्राधान्य ' यानुसार देण्यांत येईल. याची कृपया नोंद घेण्यांत यावी.
8. प्रत्येक सत्राच्या शेवटी प्रशिक्षणार्थीची परीक्षा घेण्यात येईल.

शासनाने उपलब्ध करुन दिलेली प्रशिक्षणाची सुविधा आपल्या कार्यालातील लेखा व सेवासंबंधी काम करणाऱ्या कर्मचारीवृंदास मिळावी या हेतूने आपल्याकडून योग्य प्रतिसाद मिळेल ही अपेक्षा आहे.

आपला,

(एस.बी. काकडे)
सहा. संचालक ( प्रशिक्षण)
महाराष्ट्र वित्त व लेखा प्रशिक्षण केंद्र चेंबूर, मुंबई

**महाराष्ट्र लेखा लिपिक प्रशिक्षण सत्र क्र. 205 (दि. 08/08/2016 ते दि.17/10/2016) चे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विषयाचे नाव | | विषयाचे घटक | दिनांक | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|---|
| 1. | सामान्य विषय<br>पेपर -1 – भाग 1<br>पेपर -1 - भाग 2 | 1. | कार्यालयीन कार्यपदधती, मसुदा लेखन , टिपणी लेखन | दि. 08/08/2016 ते दि. 10/08/2016 | 3 दिवस |
| 2. | सेवेविषयक नियम<br>पेपर 2 – भाग 1<br>पेपेर 1 –भाग 2 | 1 | महाराष्ट्र नागरी सेवा, नियम (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती व अटी) नियम 1981 | दि. 11/08/2016 ते दि. 31/08/2016 | 14 दिवस |
| | | 2 | महाराष्ट्र नागरी सेवा, (वेतन) नियम 1981 | | |
| | | 3 | सुधारित वेतन नियम 2009 | | |
| | | 4 | महाराष्ट्र नागरी सेवा, (रजा) नियम | | |
| | | 5 | महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 1981 | | |
| | | 6 | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील व वर्तणूक )नियम 1979 | | |
| | | 7 | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982. | | |
| | | 8 | महाराष्ट्र नागरी सेवा (अंशराशीकरण) नियम 1984 | | |
| | | 9 | महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी,नियम 1998 | | |
| | | 10 | आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये व रोखनोंदवही | | |
| | | 11 | प्रचलित प्रवास भत्ता नियम | | |
| | | 12 | गट विमा योजना | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3. | कोषागार व वित्तीय नियमे | 1 | मुंबई वित्तीय नियमावली, 1959. | दि.01/09/2016 ते दि.16/09/2016 | 11 दिवस |
| | | 2 | महाराष्ट्र कोषागार नियम 1968.खंड-1 | | |
| | | 3 | अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका | | |
| | | 4 | महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 | | |
| | | 5 | Account code volume- I | | |
| 4. | स्थानिक स्वराज्य संस्थांचे कायदा व नियम | 1 | महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या कायदा 1961 , लेखा संहिता | दि. 17/09/2016 ते दि. 29/09/2016 | 10 दिवस |
| | | 2 | महाराष्ट्र नगर परिषदा लेखा संहिता 1971<br>महाराष्ट्र नगर परिषदा अधिनियम 1965 | | |
| | | 3 | मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 | | |
| | | 4 | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता | | |
| 5. | e- GOVERNANCE | 1. | सेवार्थ, कोषवाहिनी, अर्थसंकल्प अंदाज वाटप आणि खर्च योजना (BEAMS), ई-चलन, अर्थहीनी , नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS), निवृत्तीवेतनवाहीनी | दि.30/09/2016 ते दि. 17/10/2016 | 12 दिवस |

**महाराष्ट्र पर्यवेक्षी प्रशिक्षण सत्र क्र. 121 (दि. 08/08/2016 ते दि. 29/10/2016) चे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विषयाचे नाव | | विषयाचे घटक | दिनांक | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|---|
| | पूर्ण सत्र | | | | |
| 1. | सारांश व मसुदा लेखन | 1. | परिच्छेद व पत्रव्यवहार , सारांश लेखन, मसुदा लेखन, वाक्य सुधारणा | दि. 08/08/2016 ते दि. 10/08/2016 | 3 दिवस |
| 2. | सेवेविषयक नियम | 1 | महाराष्ट्र नागरी सेवा, नियम (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती व अटी) नियम 1981 | दि. 11/08/2016 ते दि. 31/08/2016 | 14 दिवस |
| | | 2 | महाराष्ट्र नागरी सेवा, (वेतन) नियम 1981 | | |
| | | 3 | सुधारित वेतन नियम 2009 | | |
| | | 4 | महाराष्ट्र नागरी सेवा, (रजा) नियम | | |
| | | 5 | महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 1981 | | |
| | | 6 | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील व वर्तणूक )नियम 1979 | | |
| | | 7 | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982. | | |
| | | 8 | महाराष्ट्र नागरी सेवा (अंशराशीकरण) नियम 1984 | | |
| | | 9 | महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी,नियम 1998 | | |
| | | 10 | आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये व रोखनोंदवही | | |
| | | 11 | प्रचलित प्रवास भत्ता नियम | | |
| | | 12 | गट विमा योजना | | |
| 3. | कोषागार व वित्तीय नियमे | 1 | मुंबई वित्तीय नियमावली, 1959. | दि. 01/09/2016 ते दि. 09/09/2016 | 7 दिवस |
| | | 2 | महाराष्ट्र कोषागार नियम 1968.खंड-1 | | |
| | | 3 | अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका | | |
| | | 4 | महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 | | |
| 4. | लेखे विषयक नियमे | 1. | केंद्र व राज्य शासनाचे लेखाविषयक (मुलभूत) नियम | दि. 12/09/2016 ते दि. 16/09/2016 | 4 दिवस |
| | | 2. | केंद्र व राज्य शासनाचे लेखाविषयक (मुलभूत) नियम Vol - II | | |
| | | 3. | केंद्र व राज्य शासनाचे लेखाविषयक (मुलभूत) नियम Vol – IV | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5. | स्थानिक स्वराज्य संस्थांचे कायदा व नियम | 1 | महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या कायदा 1961 , लेखा संहिता | दि. 17/09/2016 ते दि. 29/09/2016 | 10 दिवस |
| | | 2 | महाराष्ट्र नगर परिषदा लेखा संहिता 1971<br>महाराष्ट्र नगर परिषदा अधिनियम 1965 | | |
| | | 3 | मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 | | |
| | | 4 | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता | | |
| 6. | e- GOVERNANCE & English | 1. | सेवार्थ, कोषवाहिनी, अर्थसंकल्प अंदाज वाटप आणि खर्च योजना (BEAMS), कोषवाहिनी, ई-चलन, अर्थवाहिनी, नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS), निवृत्तीवेतनवाहीनी | दि 30/09/2016 ते दि. 7/10/2016 | 7 दिवस |
| 7. | बुक किपींग & Other | 1 | श्री. जे.आर.बाटीबोई यांचे पुस्तक आगाऊ लेख्ये (बारावी आवृत्ती ) अध्याय VI,IX,XIV,XV,XXII , DDIV | दि. 10/10/2016 ते दि. 29/10/2016 | 15 दिवस |
| | | 2 | श्री. आर एन कार्टर यांचे आगाऊ खाते संबधित विभाजने करुन प्रगत खाते (1) वरील | | |
| | | 3 | भारत सरकारने लेखा व लेखा परिक्षण (चौथी आवृत्ती) भाग -3 व 4परिचर (सैन्य खाते, रेल्वे आणि पोस्ट व टेलीग्राफ खाते वगळून ) | | |
| | | 4 | महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची कोड खाते | | |
| | | 5 | महाराष्ट्र महानगरपालिका कोड खाते 1971 | | |
| | | 6 | भारत सरकारने लेखा व लेखा परिक्षण (चौथी आवृत्ती) भाग -1 व 2 (सैन्य खाते, रेल्वे आणि पोस्ट व टेलीग्राफ खाते) | | |
| | | 7 | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा खाते (2,3,6 ते 11,12 (12-1 ते 12-4) | | |
| | | 8 | गट ब | | |
| | | 9. | भारतीय राज्यघटना (लेख 109 ते 117, 148 ते 151, 207 ते 215, 234 ते 293, 308 ते 323, 356 ,357) | | |

संबंधित कार्यालयाने खालील नमुन्यात माहिती पाठवावी.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | कोणत्या पदावर कार्यरत आहे | कोणत्या मोडयुल्स साठी प्रवेश घेणार आहे | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | |
| 1 | 2 | 3 | 4 | | | | | 5 |
| | | | | | | | | |

संबंधित कार्यालयाने खालील नमुन्यात माहिती पाठवावी.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | कोणत्या पदावर कार्यरत आहे | कोणत्या मोडयुल्स साठी प्रवेश घेणार आहे | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | |
| 1 | 2 | 3 | 4 | | | | | | | 5 |
| | | | | | | | | | | |